महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र. ७२-८५/तेरा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ एप्रिल १९९१.

वाचा:- [१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-आरटीआर-११७४/२०३२/बारा, दिनांक २३ सप्टेंबर १९७५.

[२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-आरटीआर-११७५/२०३२/१२९०/बारा, दिनांक ७ जुलै १९७६.

[३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०८९/प्र.क्र. ३४/८९/१२, दिनांक २६ नोव्हेंबर १९९०.

[४] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०८९/प्र.क्र. ३४-अ/८९/बारा, दिनांक २६ नोव्हेंबर १९९०.

## शासन निर्णय

उपरोक्त दिनांक २३ सप्टेंबर १९७५ आणि दिनांक ७ जुलै १९७६ च्या शासन निर्णयानुसार एस.एस.सी. अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व चतुर्थश्रेणीमध्ये तीन वर्षे सलग सेवा पूर्ण झालेल्या चतुर्थश्रेणी कर्मचा-यास तृतीयश्रेणीतील फक्त लिपिक पदावर त्या त्या विभागात/कार्यालयात त्या त्या विशिष्ट वर्षी रिक्त झालेल्या पदांच्या २५ टक्के पदांवर पदोन्नती देण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. पदोन्नतीची ही संधी लिपिक पदाव्यतिरिक्त लिपिक-टंकलेखक/टंकलेखक या पदांसाठीही उपलब्ध करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. याबाबतीत सचिवसमितीच्या दिनांक २७ डिसेंबर १९८७ रोजी झालेल्या बैठकीतील शिफारशी लक्षात घेऊन आणि उपरोक्त दिनांक २६ नोव्हेंबर १९९० च्या शासन निर्णयातील आदेशानुसार लिपिक, लिपिक-टंकलेखक आणि टंकलेखक या संवर्गाचे एकत्रिकरण करून लिपिक-नि-टंकलेखक असा एकच संवर्ग निर्माण करण्यात आला आहे हेही विचारात घेऊन चतुर्थश्रेणीतील पात्र कर्मचा-यांना तृतीयश्रेणीतील लिपिक-नि-टंकलेखक या पदावर पदोन्नती देण्याबाबत आता पुढीलप्रमाणे शासन आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

[१] एस.एस.सी. अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि चतुर्थश्रेणीत तीन वर्षे सलग सेवा पूर्ण झालेल्या कर्मचा-यांना तृतीयश्रेणीत त्या विशिष्ट वर्षी रिक्त झालेल्या लिपिक-नि-टंकलेखक पदांच्या २५ टक्के पदांवर पदोन्नती देण्यात यावी.

[२] चतुर्थश्रेणीतील पात्र कर्मचा-यांना त्यांनी टंकलेखनातील आवश्यक गती [प्र.मि.४० शब्द इंग्रजी आणि ३० शब्द मराठी] असल्याचे नियमानुसार विहीत केलेले प्रमाणपत्र [कमर्शियल सर्टिफिकेट] सादर करण्याच्या अटीवर तृतीयश्रेणीतील लिपिक-नि-टंकलेखक या पदांवर पदोन्नती देण्यात यावी.

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
15 MAY 199
शाखा- आस्थापना

[क्र.मा.प.]

शामसु-रोटा-साप्रवि-एच-५०[३,५००-५-९१]

चतुर्थश्रेणीत प्रवेश करताना एस.एस.सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत ज्या दिवशी त्यांची तीन वर्षे सलग सेवा पूर्ण होईल तो दिनांक ज्येष्ठतेचा दिनांक समजण्यात यावा व चतुर्थश्रेणीत नियुक्ती झाल्यानंतर एस.एस.सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांची तीन वर्षे सलग सेवा झाली असल्यास एस.एस.सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक ज्येष्ठतेचा दिनांक समजण्यात यावा.

[४] प्रत्येक विभागाने प्रत्येक जिल्ह्यातील आपापल्या कार्यालयांसाठी [जिल्हा स्तरावर] स्वतंत्र आणि सामायिक ज्येष्ठता यादी तयार करून त्या त्या जिल्ह्यातील आपल्या विभागाची सर्व कार्यालये मिळून त्या विशिष्ट वर्षी उपलब्ध होणाऱ्या रिक्त पदांपैकी २५ टक्के पदे चतुर्थश्रेणीतील पात्र व्यक्तींच्या ज्येष्ठता यादीतून भरावीत.

[५] चतुर्थश्रेणीतील पात्र कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता यादी ठेवण्यासाठी प्रत्येक विभागाने त्या त्या जिल्ह्यातील आपापल्या कार्यालयांमधून एखाद्या अधिकाऱ्याची नियुक्ती करावी.

[६] मंत्रालयीन विभागांच्या बाबतीत मात्र सध्याप्रमाणेच प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र यादी तयार करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

भा.म. भावे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई [पत्राने],
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई [पत्राने],
प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई [पत्राने],
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई [पत्राने],
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, [विधानसभा/विधानपरिषद], मुंबई [पत्राने],
महालेखापाल-१ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-१ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयाच्या विविध विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.